# तळेगांव दाभाडे नगरपरिषद

(5)

ता. मावळ, जि. पुणे

## बांधकाम चालू करण्याकरिता दाखला

## कमेन्समेन्ट सर्टिफिकेट

## (Commencement Certificate)

(सदरहू बांधकाम चालू करण्याचा दाखला म .प्रा .व. न. र.अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये खालील अटी व शर्तींनुसार देण्यात येत आहे.) (जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्काचे संदर्भ न घेता अर्जदारास हे संमती पत्र देण्यास येत आहे.)

जा. क्र. : ननि/बाप/कानि/१/३८९/०११
तळेगांव दाभाडे नगरपरिषद
नगरनियोजन व विकास विभाग
ता. मावळ, जि. पुणे – ४१० ५०६.
दिनांक : ३ / ९ /२०११

प्रति,
श्री./श्रीमती./मे. नारायण भाऊ भाऊ खांडगे व इ. तर्फे विकसक मे. श्री स्वामी समर्थ रियलटर्स ॲण्ड इन्फ्रा. तर्फे प्रोप्रा. मिलिंद भा. चोरवरकर व राजेंद्र बा. शेळके तर्फे कु.मु.धा.
द्वारा ला. सु. श्री. मे. श्री स्वामीसमर्थ रियलटर्स ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे प्रोप्रा. मिलिंद भा. चोरवरकर
राह मिलिंद भा. चोरवरकर ॲण्ड असो. त. दाभाडे

महोदय / महोदया

आपण दिनांक १६/७/२०११ रोजी पाठविलेला तळेगांव दाभाडे नगरपरिषद हद्दितील सि. स. क्र. २१६७, २१७२ ते २१७३, २१७४, २१७६
स. क्र. — भूखंड क्र. – त. स्टेशन वर नविन बांधकाम / उभारणी / फेरबदल या संबंधीचा अर्ज मिळाला. सदर बाबतीत आवश्यक तपासणी व चौकशी केल्यानंतर खालील अटी व शर्तींना अधीन राहून बांधकाम सुरू करण्यास तुम्हास संमती पत्र देण्यात येत आहे.

१) सोबत मंजुर केलेल्या ( हिरव्या रंगात दुरुस्ती केल्याप्रमाणे) नकाशाप्रमाणे बांधकाम केले पाहिजे कोणत्याही प्रकारच्या अटी व शर्ती भंग केल्याचे किंवा पालन न केल्याचे किंवा अर्जात चुकीची माहिती दिल्याचे आढळल्यास सदर परवाना रद्द करण्यात येईल.

२) प्रश्नाधीन भूखंड बिगरशेती कारणासाठी वापरणेस संबंधीत महसूल अधिकारी यांची लेखी संमती घेऊन नगरपरिषदेस सादर करावी. तसेच नागरी जमिन कमालमर्यादा अधिनियमाखाली आवश्यक परवानगी सक्षम प्राधिकारी यांचेकडून घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय बांधकाम सुरू करू नये. नविन बांधकामासाठी झाडे तोडणे आवश्यक असल्यास त्यासाठी ट्री ॲथोरिटीकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. यु. एल. सी. च्या कोणत्याही बाबी बाबत न. प. जबाबदार नाही. यांची नोंद घ्यावी.

३) संबंधीत भूखंडावर तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / सिटी सर्व्हे ऑफिस कडून प्रत्यक्ष जागेवर सिमांकन करून घ्यावे.

४) पाया खोदाई सुरू करण्यापुर्वी म्यु. आवेक्षक यांचेकडून लाईन आऊट तपासून घेणे व नंतर प्रत्यक्ष काम सुरू करावे.

५) सदर भूखंडालगत / जवळुन / वरून कोणत्याही प्रकारची विद्युत वाहिनी जात असल्यास त्या बाबत एम. एस. ई. बी. अगर सक्षम अधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून ते न. प. स. सादर करावे त्या शिवाय कामास सुरूवात करू नये.

६) प्लिंथ चेकींग दाखला घेतल्याशिवाय पुढील काम करू नये (प्लिंथ चेकिंगचा दाखला घेतेवेळी स्ट्रक्चरल इंजिनिअरचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

७) इमारतीतील सांडपाणी / पावसाचे पाणी यांची निर्गत आणि घरातील नळ फिटींग काम, नगरपरिषदेकडे नोंदणी कृत प्लंबरकडून इकडील सूचनेप्रमाणे करून घेणेच आहे. सेप्टीक टँकचे साईज स्टँडर्डप्रमाणे असावेत.

८) इमारत आवारात (भूखंडाच्या १०० चौ. मी. क्षेत्रास एक या प्रमाणे किंवा) किमान दोन झाडे लावून त्यांची जोपासना करणे आवश्यक आहे.

९) ग्रुप हाऊसिंग योजना असल्यास प्रत्येक टेनामेंट मागे कमीत कमी दोन झाडे लावून त्याची जोपासना करणे आवश्यक आहे.

१०) प्रस्तुत परवानगी प्रमाणे इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत कंम्प्लीशन सर्टिफिकेट करिता पर्यवेक्षकांच्या प्रमाणपत्रासह लेखी अर्ज देऊन व इकडील लेखी परवानगी घेऊन मगच इमारत भोगवट्यास घेणेची आहे.